व्यंकटेश महाविद्यालयात ट्रेड फेअर संपन्न

"श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथे पहिल्यांदाच ट्रेड फेअर चे आयोजन करण्यात आले होते संपूर्ण महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद या 'वाणिज्य व्यापार मेळाव्यास' मिळाला एकूण चौसष्ट स्टॉल या वाणिज्य व्यापार मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांनी लावले होते. यामध्ये फूड, ज्वेलरी, पेये, फुटवेअर, गेम्स, दक्षिणात्य खाद्यपदार्थ, सौंदर्य प्रसाधने, पाणीपुरी, भेल अशा विविध प्रकारचे स्टॉल लावण्यात आले होते." सदर ट्रेड फेअर प्रसंगी ना.बा. एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन माननीय श्री. श्रीकृष्ण बोहरा शेठजी उपस्थित होते. आपल्या मनोगतामध्ये ते म्हणाले की, व्यंकटेश महाविद्यालय निश्चितच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमी कार्यरत असते. नवनवीन उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आयोजित करत असते याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयाने या नवीन वर्षामध्ये केवळ नोकरी करणारे विद्यार्थी न घडवता चांगले उद्योजक देखील घडावेत या उद्देशाने वाणिज्य व्यापार मेळावा हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे याचा सार्थ अभिमान आहे. त्याचबरोबर संस्थेचे पदाधिकारी माननीय श्री. श्रीकांत चंगेडिया, श्री, महेश भांडवलकर, श्री. अहमद मुजावर, गोविंदराव हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. तेली सर उपस्थित होते. व्यवसाय कौशल्य विद्यार्थ्यांना मिळावे आणि चार भिंतीमधील व पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रत्यक्षात व्यवसाय काय असतो, त्याचे नियोजन काय असते ते विद्यार्थ्यांना माहीत व्हावे हा उद्देश ट्रेड फेअरच्या आयोजना मागचा होता. व्यवसायासाठी आवश्यक उत्पादन घटक जसे की, कच्चामाल, मनुष्यबळ, भांडवल, यंत्रसामग्री व या सर्वांचे योग्य असे व्यवस्थापन कशा पद्धतीने करायला हवे याचे ज्ञान विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्षात व्यवसाय करून अनुभवातून त्यांनी शिकावे यासाठी महाविद्यालयाने यावर्षीपासून 'Commerce Nexus 2K25' हा एक नवीन उपक्रम सुरू केला आहे. असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय माने आपल्या मनोगतामध्ये म्हणाले. डॉ. एस. एच.आंबवडे यांनी सदर ट्रेड फेअर चे आयोजन व नियोजनाचे प्रमुख म्हणून काम पाहिले. विद्यार्थ्यांनी व्यवस्थापन, मार्केटिंग, अकाउंट आणि उद्योजकता या सर्व विषयांचे ज्ञान, केवळ ज्ञान नाही तर प्रत्यक्षात कृतीद्वारे शिक्षण एकाच छताखाली अवगत करावे यासाठी हा उपक्रम व्यंकटेश महाविद्यालयाने आयोजित केला आहे त्यामुळे विद्यार्थ्यांचे वाणिज्य शाखेतील सर्व विषयांचे आवश्यक ज्ञान मिळवून देण्यासाठी ट्रेड फेअर प्लॅटफॉर्म उपलब्ध करून दिला जात आहे याचा लाभ विद्यार्थ्यांना होईल. असे त्यांनी आपल्या मनोगतामध्ये मत व्यक्त केले. एन.एस.एस. विभागामार्फत स्वयंसेवकांनी शारीरिक शिक्षण संचालक श्री. अमिन बाणदार यांच्या अध्यक्षतेखाली शिस्त, स्वच्छता, देखरेख यासाठी सेवा देण्याची कामगिरी बजावली तसेच महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लेझीम व झांज पथक सादरीकरण करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी वर्ग यावेळी उपस्थित होता. व्यापार मेळावा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व प्राध्यापक व प्राध्यापक व इतर कर्मचारी, विविध कमिटी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. गावातील अनेक नागरिकांनी व्यापार मेळाव्यासाठी गर्दी केली होती. प्रत्येक स्टॉलवर पदार्थ चाखण्यात खवयेगार मनमुराद आनंद लुटत होते तर दुसरीकडे व्यवसाय चालवण्याचा अनुभव घेण्यासाठी, उद्योजक बनण्याचे स्वप्न उराशी बाळगून विद्यार्थ्यांची कसरत चालली होती. संपूर्ण सोहळ्यास एक प्रकारे जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. सर्व व्यंकटेश महाविद्यालयातील संपूर्ण टीमने यासाठी मेहनत घेतली आणि वाणिज्य व्यापार मेळावा यशस्वीपणे पार पडला.

